नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - १५ Issue - 15 | वार रविवार दि. १ जून २०२५ Blow- Sunday Date 1 June 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## पुण्यात मोठी दुर्घटना, कारने बारा जणांना उडवले, तिघांची प्रकृती गंभीर

### ३ गंभीर रुग्णांवर संचेती रुग्णालयात उपचार सुरु

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : पुण्यात अपघाताच्या घटना काही केल्या कमी होताना दिसत नाही. पुण्याच्या कल्याणीनगर येथील पोर्शे कार घटनेला काही महिने होत असतानाच आता आणखी एक धक्कादायक अपघाताची घटना समोर येत आहे. कल्याणीनगर येथील पोर्शे कार अपघ-ातात दोन जणांचा मृत्यू झाला होता. या घटनेमुळे संपूर्ण राज्य हादरलं होतं. यानंतर आज झालेल्या अपघातात १२ जणांना उडवल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. या अपघातात जखमी झालेल्यांबाबत महत्त्वाची माहिती समोर येत आहे. भरधाव कारने १२ जणांना उडवलं. यापैकी ३ जणांची प्रकृती गंभीर असल्याची माहिती मिळत आहे. तर एका जणाचा पाय फ्रॅक्चर झाल्याची माहिती मिळत आहे. संबंधित व्यक्तीच्या पायावर तातडीने शस्त्रक्रिया केली जात असल्याची माहिती मिळत आहे.



पुणे हे विद्येचं माहेरघर आहे. इथे एमपीएससीचा अभ्यास करणारे हजारो विद्यार्थी राज्यभरातून येतात. अधिकारी बनण्याचं स्वप्न उराशी घेऊन पुण्यात दिवस-रात्र अभ्यास करतात. हे विद्या-र्थी तासंतास पुण्यातील अभ्यासिकांमध्ये अभ्यास करत बसलेले असतात. पण आज अशाच काही विद्यार्थ्यांना खूप दुर्दैवी घटनेला सामोरं जावं लागलं आहे. या घटनेमुळे विद्यार्थी वर्गात मोठी खळबळ उडाली आहे.

विशेष म्हणजे पुण्याच्या अतिशय मध्यवर्ती भागात असलेल्या सदाशिव पेठेत अपघाताची घटना घडली आहे. या भागात अनेक अभ्यासिका आहेत. या अभ्यासिकांमध्ये शेकडो विद्यार्थी तासंतास अभ्यास करत असतात. या दरम्यान आज (शुक्रवारी) संध्याकाळी साडेपाच वाजेच्या सुमारास काही विद्या-र्थी श्री साईनाथ अमृततुल्य या चहाच्या दुकानावर चहा पिण्यासाठी आले होते.

विद्यार्थ्यांचा मोठा घोळका या चहाच्या दुकानाबाहेर होता. पण हा घोळका न पाहता एका भरधाव कारने विद्यार्थ्यांना उडवलं. अपघाताची ही मोठी दुर्घटना असल्याची माहिती आहे. कारण या अपघातात १२ जण जखमी झाले आहेत. त्यापैकी ३ जण गंभीर असल्याची माहिती आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ३ गंभीर रुग्णांना संचेती रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. तर उर्वरित ९ जखम ींना मोडक रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. यापैकी एकाच्या पायाचं हाड मोडलं आहे. त्याच्या पायावर शस्त्रक्रिया केली जाणार असल्याची माहिती आहे. तर इतर ८ जण हे किरकोळ जखमी झाल्याची माहिती आहे.

या घटनेनंतर पोलिसांकडून कारवाई केली जात आहे. घटनेनंतर विश्रामबाग पोलीस ठाण्याचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी घटनास्थळी काय घडली याबाबत सविस्तर माहिती घेतली. घटना घडली त्या परिसरातील सीसीटीव्हीची पाहणी केली जाण्याची शक्यता आहे. पोलिसांनी या घटनेतील भरधाव कारचालकाला आणि त्याच्यासोबतच्या सहप्रवाशाला ताब्यात घेतलं आहे. कारचालकावर गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आल्याची माहिती मिळत आहे.

## जखमी विद्यार्थ्यांचा खर्च राज्य सरकार करणार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : पुण्यामध्ये आज थरकाप उडवणारी घटना घडली आहे. पोर्शे अपघातासारखाच ही भयंकर घटना घडली आहे. आज पुण्याच्या म ध्यवर्ती भागातील सदाशिव पेठेत भावे हायस्कुल जवळ भरधाव कारने थेट १२ जणांना उडवले. या अपघातात सर्वजण जखमी झाले आहेत,तर ३ जणांची प्रकृती गंभीर असल्याची माहिती आहे. जखमींमध्ये बहुतेक विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घोषणा**

यासंदर्भात आता स्थानिक आमदार हेमंत रासने यांनी जखमी विद्यार्थ्यांसाठी महत्वाचे काम केले आहे. त्यांनी मुख्यमंत्र्यांशी संपर्क साधला असता, विद्यार्थ्यांचा सर्व खर्च राज्य सरकार उचलणार असल्याचा निर्णय मुख्यमंत्र्यांनी घेतला आहे.

स्थानिक आमदार हेमंत रासने यांनी सांगितले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत फोन-वर बोलणे झाले आहे. फडणवीस यांनी पुण्यातील कार दुर्घटनेत जखमी झालेल्यांचा खर्च सरकार उचलणार असल्याचे सांगितले आहे. त्यामुळे जखमी विद्यार्थ्यांचा पूर्ण खर्च राज्य सरकार उचलणार असल्याचे जाहीर करण्यात आले. यासोबतच जखमींपैकी काही विद्यार्थ्यांची उद्या परीक्षा आहे, त्यासंदर्भात सुद्धा विद्यार्थ्यांना दिलासा मिळेल, असा निर्णय घेणार असल्याचे फडणवीसांनी आश्वासन दिले आहे. रासने पुढे म्हणाले, भावे हायस्कूलजवळ झालेल्या अपघा-तातील जखमींमध्ये १२ जणांपैकी काही विद्यार्थी असून ते स्पर्धा परीक्षेची तयारी करत आहेत. नुकसान होऊ नये, यासाठी विद्यार्थ्यांसाठी सकारात्मक निर्णय घेण्याचा शब्द मुख्यमंत्र्यांनी दिला आहे. पुण्याला विद्येचे माहेर-घर म्हटले जाते. त्यामुळे अधिकारी होण्याचं स्वप्न उराशी बाळगत इथे राज्यभरातील हज-ारो तरुण येतात. स्पर्धा परीक्षांच्या अभ्यासासाठी इथे अनेक अभ्यासिका आहेत. तर अपघात घडला त्याठिकाणीही अभ्यासिका आहेत. येथे अनेक विद्यार्थी वास्तव्यास आ-हेत. बाजूलाच भावे हायस्कूल आहे. अपघात सायंकाळी घडला जेव्हा विद्यार्थी स्टॉलवर उभे राहून चहा पित होते. इतक्यात भरधाव कारने तेथे उपस्थित अनेकांना उडवले. या घटनेचा थरकाप सीसीटिव्ही कॅमेऱ्यात कैद झाला आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, दारूच्या अंमलाखाली हुंदाई औरा गाडीचा चालक आणि त्याच्यासोबतचा एक सा-थीदार हे गाडीमध्ये असताना एक्सीलेटरचा ताबा सुटल्याने तिथे उभ्या असणाऱ्या लोकांना जाऊन धडकले. याप्रकरणी पोलिसांनी कारचालकासह तिघांना ताब्यात घेतले आहे.

## जेव्हा संकट आले तेव्हा भारत एकसंध आणि मजबूत राहिला याचे श्रेय संविधानाला दिले पाहिजे : सरन्यायाधीश गवई

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



लखनऊ : भारताचे सरन्यायाधीश बी.आर. गवई यांनी एका कार्यक्रमात संबोधित करताना म्हटले की, जेव्हा जेव्हा देशावर संकट आले तेव्हा ज्या ताकदीने आणि एकजुटीने तोंड दिले 'याचे श्रेय केवळ संविधानाला द्यायला हवे.' इलाहाबाद उच्च न्यायालयात ६८० कोटी रुपयांचा निधी खर्चून नव्याने ॲडव्होकेट चेंबर बिल्डिंग आणि मल्टी-लेव्हल पार्किंग बांधण्यात आले आहे. याच्या उद्घाटनप्रसंगी गवई म्हणाले की, न्याय व्यवस्थेचे मूलभूत कर्तव्य देशातील त्या शेवटच्या नागरिकापर्यंत पोहोचवायचे आहे ज्याला न्यायाची आवश्यकता आहे. त्यांनी असेही अधोरेखित केले की, कायदेमंडळ आणि कार्यपालिकेचे कर्तव्य समान आहे.

सरन्यायाधीश म्हणाले, 'जेव्हा जेव्हा संकट आले तेव्हा भारत एकसंध आणि मजबूत राहिला. याचे श्रेय संविधानाला दिले पाहिजे.' ते म्हणाले, 'भारतीय संविधानाच्या अंमलबजावणीच्या ७५ वर्षांच्या प्रवासात, सामाजिक आणि आर्थिक समानता आणण्यात कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्यायपालिकेने मोठे योगदान दिले आहे, असे अनेक कायदे आणण्यात आले ज्याअंतर्गत जमीनदारांकडून जमीन काढून भूमि हीन लोकांना देण्यात आली.'

सरन्यायाधीश पुढे म्हणाले, 'कायद्यांना वेळ-ोवेळी आव्हान देण्यात आले. १९७३ पूर्वी, सर्वो च्च न्यायालयाचे मत असे होते की, जर निर्देशक तत्वे आणि मूलभूत हक्कांमध्ये संघर्ष झाला तर म ूलभूत हक्कांनाच यश मिळेल.' गवई असेही म्हणाले की, '१९७३ मध्ये १३ न्यायाधीशांनी असा निर्णय दिला की, संसदेला संविधानात सुधारणा करण्याचा अधिकार (पान २ वर...)

## पाकिस्तानी हेरगिरी प्रकरणी एनआयएकडून ५ राज्यात १५ ठिकाणी छापेमारी; पीआयओशी संबधित संशयित लोकांच्या मालमत्तांवर छापे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : पाकिस्तानी हेरगिरी प्रकरणात नॅशनल इन्व्हेस्टिगेशन एजन्सी कडून ५ राज्यात १५ ठिकाणी छापेमारी करण्यात आल्याची मोठी बातमी समोर आली आहे. पीआयओशी संबधित संशयित लोकांच्या मालम त्तांवर ही छापेमारी करण्यात आली आहे. दिल्ली, मुंबई, हरियाणा, उत्तर प्रदेश राजस्थान छत्तीसगड आसाम आणि पश्चिम बंगाल या राज्यात ही छापेमारी करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. छ्ख ने या छापेमारी दरम्यान मोठ्या प्रमाणात




इलेट्रॉनिक साहित्य, संवेदनशीन आर्थिक व्यवहार असलेली कागदपत्र आणि आ-क्षेपार्ह साहित्य जप्त केली आहेत.

दरम्यान, भारतविरोधी दहशतव-ादी कटाचा भाग म्हणून पाकिस्तानस्थित व्यक्तीकडून चालवल्या जाणाऱ्या हेरगिरी रॅकेटच्या सुगावांसाठी त्यांची सखोल तपासणी केली जात आहे. तर छाप्यांमध्ये लक्ष्य केलेल्या संशयितांचे पाकिस्तानी कार्यकर्त्यांशी संबंध होते आणि ते भारतात हेरगिरी कारवाया करण्यासाठी आर्थिक मदत म्हणून काम करत होते. २०२३ पासून पीआयओंसोबत संवेदनशील माहिती शेअर करणाऱ्या आणि राष्ट्रीय सुर-क्षेशी संबंधित गोपनीय माहिती लीक करण्याच्या बदल्यात भारतातील विविध मार्गांद्वारे निधी मिळवणाऱ्या एका आरोपीला अटक केल्यानंतर एनआयएने २० मे रोजी हा गुन्हा दाखल केला होता. या प्रकरणी छ्ख अधिक तपास करत आहे. दहशतवादविरोधी छ्ख या प्रकरणात तपास सुरू ठेवत आहे, जो बीएनएस

**ज्योती मल्होत्राच्या मोबाईलमधून धक्कादायक माहिती समोर**

२०२३ च्या कलम ६१(२), १४७,१४८ अधिकृत गुपिते कायदा १९२३ च्या कलम ३ आणि ५ आणि यूए(पी) कायदा १९६७ च्या कलम १८ अंतर्गत नोंदवण्यात आला आहे. अशी देखील माहिती छ्ख कडून देण्यात आली आहे. अलीकडेच ज्योती मल्होत्रा नावाच्या यूट्यूबरलाही गुप्तहेरगिरीच्या आरोपाखाली अटक करण्यात आली आहे. आता सीआरपीएफ (पान २ वर...)

**६४ वर्षांचा रेकॉर्ड मोडला, धरणांमध्ये पाणीसाठा वाढला**

**पुढील चार दिवस पावसाचा हवामान विभागाचा अंदाज**

## पुण्यात यंदा मे महिन्यात पावसाचा विक्रम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : पुण्यामध्ये ऐन उन्हाळ्यात वादळीवाऱ्यासह बरसलेल्या पावसाने यंदा विक्रम नोंदवला आहे. पुण्यासाठी पा-वसाची मे महिन्याची सरासरी ४३ मिलिमीटर असताना या वर्षी ३१ मे अखेरीस २५७.९ मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे. एवढेच नव्हे, तर चिं-चवड, एनडीए-कोथरूड परिसर, बारामती, दौंड या भागातील नागरिकांनी ऐन उन्हाळ्यामध्ये २४ तासांत शंभर मिलिमीटर पा-वसाचाही यंदा अनुभव घेतला.

मार्च आणि एप्रिल महिन्यात पुणेकरांनी यंदा तीव्र उन्हाळा अनुभवला. मार्च महिन्यातच नागरिकांना पहिल्या उष्णतेच्या लाटेला सामना करावा लागला. एप्रिल महिन्यात ऊन अधिक तीव्र झाले होत. बहुतांश म हिना तापमानाचा पारा चाळीस अंशाच्या जवळच रेंगाळला होता. सकाळपासूनच उन्हाच्या तीव्र झळा, दुपारी उन्हाचे चटके आणि रात्री असा उकाडा अनुभवल्यानंतर आता मे म हिन्यात आता काय होणार अशी पुणेकरांनी चिंता होती.

महिन्याच्या पहिल्या आठवडयात तापमान ४० अंश सल्सिअसच्या जवळ रेंगाळले होते; पण दुसऱ्या आठवड्यात चित्र बदलले आणि वादळी वाऱ्यासह शहरासह जिल्ह्यात चौफेर पावसाला सुरुवात झाली. मे महिन्याचे शेवटचे दोन्ही आठवडे दररोज पावस-ाने हजेरी लावली. या वेळेचे वैशिष्ट्य म्हणजे पूर्व मोसमी पाऊस पडल्यानंतर पुन्हा उकाडा वाढतो; पण या वेळी पावसाचा मुक्काम वाढल्यामुळे तापमानाचा पारा या हंगामातील नीचांकी खाली गेला. महिनभरातील बारा दिवस तापमान सरासरीपेक्षा कमी नोंदवले गेले.

**शेतकऱ्यांचे नुकसान**

वादळी वारा, वीजेच्या कडकडाटासह जोरदार बरसलेल्या सरींमुळे काही भागात पूर सदृश परिस्थितीही निर्माण झाली होती. बारामती, दौंड, सासवड भागात अतिवृष्टीसदृश पा-वसामुळे पूरसदृश चित्र बघायला मिळाले.

**मान्सून लवकर दाखल**

गेल्या आठवड्यात पुणेकरांना सूर्यदर्शनाचीही प्रतीक्षा करावी लागली. वातावरणातील अनुकूल बदलांमुळे मान्सूनचेही या वर्षी अलीकडे म्हणजे २६ मे रोजीच आगमन झाले. मे म हिन्यातील या पावसाने शहराचा ६४ वर्षांतील विक्रम मोडला. या पूर्वी १९६१ मध्ये मे महिन्यात शिवाजीनगर येथे उच्चांकी १४८.८ मिलिमीटर पाऊस नोंदवला गेला होता. या वर्षी ३१ मे पर्यंत २५७.९ मिलिमीटर पाऊस नोंदवला गेला.

**नोंद पूर्वमोसमी श्रेणीमध्ये**

भारतीय हवामानशास्त्र विभागाच्या नोंदीनुसार ३१ मे महिन्यापर्यंतच्या पावसाची पूर्व मोसमी पावसाच्या श्रेणीमध्ये नोंद केली जाते. एक जूनपा-सून पडणारा पाऊस हा मान्सून श्रेणीतील पाऊस नोंदवला जा-तो. त्यामुळे मे महिन्यातील या उच्चांकी पावसाची मान्सूनच्या पावसामध्ये गणना होणार नाही. धरणात पडलेल्या पावसामुळे मात्र, पुणेकरांची पाणी कपात करण्याच्या निर्णयापासून सुटका झाली.

**चार दिवस पावसाची विश्रांती**

पुढील चार दिवस आकाश निरभ्र राहणार असून, दुप-ारी आणि संध्याकाळी आकाश अंशतः ढगाळ राहील. तापम ानातही थोडी वाढ होऊन रात्रीचा उकाडा वाढणार आहे. अनुकूल परिस्थितीअभावी पुण्यात आठवडाभर पावसाची शक्यता नाही, असा अंदाज भारतीय हवामानशास्त्र विभागाने व्यक्त केला आहे.



धरणातील पाणीसाठा
खडकवासला - पाणीसाठा - ०.८० - टक्के - ४०.३५
टेमघर - पाणीसाठा - ०.१६ - टक्के -०४.४४
वरसगाव - पाणीसाठा - २.७५ - टक्के - २१.४५
पानशेत - पाणीसाठा - १.९४ - टक्के - १८.१८
एकूण - पाणीसाठा - ५.६५ - टक्के - १९.३७

## पाकिस्तानी हेरगिरी प्रकरणी एनआयएकडून....

(पान १ वरून..) जवानाला एनआयएकडून अटक करण्यात आल्याने एकच खळबळ उडाली आहे. नॅशनल इन्व्हेस्टिगेशन एजन्सीने दिल्लीतून एका सीआरपीएफ जवानाला अटक केली आहे. या सीआरपीएफ जवानाने पाकिस्तानला भारतासंबंधी संवेदनशील माहिती पाठवल्याचा आरोप करण्यात आला आहे. ही माहिती पाठवण्यासाठी त्याला पैसे दिले जात होते. तो हे काम सोशल मीडियाच्या माध्यमातून करत होता, अशी माहिती समोर येत आहे. मोती राम जाट, सीआरपीएफ जवानाचे नाव आहे. 'ऑपरेशन सिंदूर'नंतर देशातून अनेक गुप्तहेर पकडले गेले आहेत. दुसरीकडे, हेरगिरीच्या आरोपाखाली अटक करण्यात आलेल्या हिसारच्या युट्यूबर ज्योती मल्होत्राविषयी एकामागून एक धक्कादायक खुलासे समोर येत आहेत. ज्योतीच्या मोबाईलमधून मिळालेल्या माहितीवरून असे स्पष्ट झाले आहे की, ती पाकिस्तानातील प्रसिद्ध युट्यूबर झिशान हुसैनशी नियमित संपर्कात होती. झिशानसोबत मिळून ती पाकिस्तानची प्रतिमा सकारात्मक दाखवण्यासाठी प्रयत्न करत होती. झिशानव्यतिरिक्त, ती पाकिस्तानातील इतर काही युट्यूबर्सच्या संपर्कातही होती. दोन महिन्यांपूर्वी ज्योती धार्मिक व्हिसावर पाकिस्तानला गेली होती, त्यावेळी तिने झिशानला मेसेज केला होता, अशी माहितीही आता पुढे आली आहे.

## जेव्हा संकट आले तेव्हा भारत एकसंध...

(पान १ वरून...) आहे आणि त्यासाठी ते मूलभूत अधिकारांमध्ये सुधारणा करू शकतात, परंतु संविधानाच्या मूलभूत रचनेत बदल करण्याचा अधिकार नाही.' 'खंडपीठाने असेही नमूद केले की मूलभूत अधिकार आणि मार्गदर्शक तत्त्वे दोन्ही संविधानाचा आत्मा आहेत. हे दोन्ही संविधानाच्या सुवर्ण रथाची दोन चाके आहेत. जर तुम्ही यापैकी एक चाक थांबवले तर संपूर्ण रथ थांबेल.' असेही गवई म्हणाले. 'मी नेहमीच म्हणत आलो आहे की बार आणि बेंच एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. जोपर्यंत बार आणि बेंच एकत्र काम करत नाहीत तोपर्यंत न्यायाचा रथ पुढे जाऊ शकत नाही. आज इलाहाबाद उच्च न्यायालयाने संपूर्ण देशासमोर एक चांगले उदाहरण ठेवले आहे.

# गर्भाशय कॅन्सर प्रतिबंधक लस (HPV - सर्व्हयकल कॅन्सर व्हॅक्सिन)



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पूर्वी कर्करोग ग्रस्त रुग्णांवर उपचार करण्यासाठी औषध अत्याधुनिक यंत्रतंत्रज्ञान नसल्यामुळे कर्करोग म्हटलं की मृत्यू असा समज होता परंतु मागील काही वर्षा पासून कर्करोगावरील उपचार पद्धतीत प्रचंड मोठी क्रांती झाली असल्यामुळे कर्करोगग्रस बाधितांचे जीव वाचत आहे.

परंतु कर्करोगाला प्रतिबंध उपाय योजना करून रोखता येत नसले तरी महिला, मुलींमध्ये होणाऱ्या गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाला होण्याआधीच राखता येण्यासाठी लस उपलब्ध आहेत.

९ ते २६ वर्ष वयोगट अथवा २६ वर्षावरील महिलांनाही ही लस देऊन संभाव्य कर्करोगाला (कॅन्सरला) होण्याआधीच बचाव करता येऊ शकतो. तरी प्रत्येक महिलांना संबंधित HPV लस घेऊन संभाव्य कर्करोगाच्या (कॅन्सरच्या) धोक्यापासून मुलींनी आपला बचाव करावा. गर्भाशयाच्या कॅन्सरच्या प्रतिबंधक उपाययोजनांच्या माहितीसाठी सोलापूर शहर व आसपासच्या परिसरात अनेक शाळा व महाविद्यालयाचे मुली, महिलांना माहिती दिली जाते. तरीही या विषयाबाबत समाजामध्ये जनजागृतीची आवश्यकता आहे.

प्रत्येक ८ मिनिटाला १ महिला सर्वाइकल कॅन्सर (गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगामुळे ) मृत्युमुखी पडते १५ वर्षावरील सुमारे ३ पैकी १ पुरुष एच. आय.व्ही. ने संक्रमित आहेत. जवळजवळ सर्व सर्व्हयकल कॅन्सरची प्रकरणे एच.आय.व्ही. शी संबंधित आहेत.

गर्भाशयाचा कॅन्सर हा भारतातील कर्करोग ग्रस्त महिलांमध्ये दुसरा क्रमांकाचे कारण आहे आणि जगभरातील महिलांमध्ये तो चौथा सर्वात सामान्य कर्करोग आहे. ३० वर्षावरील महिलांमध्ये तो सर्वात जास्त प्रमाणात आढळतो. दररोज सुमारे २०० महिलांचा गर्भाशयाच्या कॅन्सर मुळे मृत्यू होतो. आणि भारतात सुमारे १.२४ लाख प्रकरणे निदान केले जातात. महत्त्वाची गोष्ट म्हणजे लसीकरणाद्वारे सर्व्हयकल कॅन्सरला आळा घालता येऊ शकतो. नुकतीच अनावरण केलेली स्वदेशी एच.पी.व्ही. लस आता परवडणाऱ्या परवडणाऱ्या किमतीमध्ये उपलब्ध झाली आहे.

फमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखेच्या वतीने ज्वेलेक्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड यांच्या आर्थिक सहकार्याने ९ ते १४ वयोगटातील मुलींना ही लस मोफत उपलब्ध केली आहे. या अल्पमुदतीच्या प्रकल्पाच्या माध्यमातून माहे ऑगस्ट २०२५ पूर्वी पर्यंत वय वर्षे ९ ते १४ मधील १५० किशोरवयीन मुलींना ही लस देण्याचे लक्ष ठेवण्यात आले आहे.

ज्या पालकांना आपल्या किशोरवयीन मुलींना ही लस द्यावयाची आहे त्यांनी मुलींची नावे सम्राट चौक, सोलापूर येथील चिडगुपकर हॉस्पिटल मध्ये ही नोंद करावीत. तसेच फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडियाचे शाखाधिकारी, सुगतरत्न गायकवाड मो. नंबर ९०११९०७००१, कार्यक्रम अधिकारी वीरेंद्र परदेशी मो. नंबर ९८६०६७०७१५, परिचारिका आशालता मस्के मो. नं. ९९२२९६०६७२, परिचारिका रोजमेरी गायकवाड मो. नं. ९५४५९९१८४२ यांच्याकडे नावे नोंदवावीत.

ही लस चिडगुपकर हॉस्पिटल व फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखेच्या जोडबसवण्णा चौक, बुधवार बाजार, जन्नत कॉम्प्लेक्स समोरील पद्मावती क्लिनिकमध्ये उपलब्ध आहेत

आपल्या आर्थिक व आरोग्य धोरणात याचा समावेश करावा व हि लस उपलब्ध करून द्यावी यासाठी शासन स्तरावर प्रयत्न व्हावेत. क्ष्रत लस शासनाने उपलब्ध करून द्यावी यासाठी फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडियाच्या वतीने प्रयत्न करण्यात येत आहेत. यासाठी जिल्हाधिकारी, सोलापूर महानगरपालिका आयुक्त, जिल्हा आरोग्य अधिकारी, छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय व संशोधन केंद्र, डॉ. वैशंपायन स्मृती शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता, जिल्हा शल्यचिकित्सक , सोलापूर महानगरपालिका आरोग्य अधिकारी यांना निवेदन देण्याचे काम सुरू आहे

**– डॉ. मीनल चिडगुपकर**
**स्त्रीरोग व प्रसूती शास्त्रतज्ञ**
**एफ. पी. ए.आय. सोलापूर शाखा, मेडिकल सब कमिटी मेंबर**
**मो. नं. ९८९०८३८८८४**

# आदर्श लोकसंचलीत साधन केंद्र खोणी भिवंडी यांची वार्षिक सर्वसाधारण सभा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : महिला आर्थिक विकास महामंडळ स्थापित आदर्श लोकसंचलित साधन केंद्र खोणी, भिवंडी यांची ५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा २८.०५.२०२५ रोजी भिवंडी , अजयनगर शिवसेना भवन येथे कार्यक्रम संपन्न झाले, यावेळी वरिष्ठ जिल्हा समन्वय अधिकारी संजय गरजे महिला आर्थिक विकास महामंडळ ठाणे यांनी बचत गटातील महिलांना स्वतःच्या विकास कस करायचं, स्वतःच्या पायावर ऊभे रहाणे गरजेचे आहे. महिला आर्थिक, सामाजिक राजकीय दृष्टीने सक्षम झाली पाहिजे. अशा प्रकारे मोलाचे मार्गदर्शन केले. त्याचं प्रमाणे आदर्श लोकसंचालित साधन केंद्राची खोणी या संस्थेच्या अध्यक्ष पदी सोनल रापटे व उपाध्यक्ष उर्मिला शिंगे यांची निवड केली तसेच सचिव म्हणून सरिता भगत व सदस्याची निवड कार्यक्रमात करण्यात आली. त्याच प्रमाणे वार्षिक सर्वसाधारण सभे मध्ये उत्कृष बचत, उत्कृष ग्राम संघांचे, उत्कृष्ट सी आर पी समुदाय साधन व्यक्ती तसेच सहयोगिनी ज्योती जाधव, पद्मिनी जाधव यांचे गुणगौरव व सन्मान करण्यात आला. तसेच जिल्हा नियोजन ठाणे मार्फत मिळालेल्या रसवंती , पापड मशीन व कांडप मशीन चे गरजू महिलांना मशीनचे वाटप वरिष्ठ जिल्हा समन्वय अधिकारी संजय गर्जे , तालुका अभियान व्यवस्थापक पंढरी भला , हेमंत पाटील , आय सी आय सी आय बँकेचे अधिकारी यांच्या हस्ते वाटप करण्यात आले. कार्यक्रमा मध्ये आदर्श लोकसंचालीत साधन केंद्राचा शाश्वत आराखडा २०२५- २०२६ चे वाचन करून मंजुरी घेण्यात आली. तसेच संस्थेच्या २०२४-२०२५ या आर्थिक वर्षात खर्चाचे सादरीकरण करून मंजूर घेण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संस्थेचे व्यवस्थापक सचिन स वाघचौरे यांनी केले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.

# शिवसैनिक निवडून येण्यासाठी प्रयत्न करणार : शिवसेना नेते चंद्रकांत खैरे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लातूर प्रतिनिधी/अमर जाधव :



लातूर दि.२८ (प्रतिनिधी) आता होणाऱ्या सर्व निवडणुका या कार्यकर्त्यांच्या आहेत. महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायती, जिल्हा परिषद, पंचायत समिती या सर्व निवडणुकीमध्ये शिवसैनिक निवडून आला पाहिजे, याची जबाबदारी पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी सर्व शिवसेना नेत्यांवर सोपवली आहे. ८० टक्के समाजकारण हीच शिवसेनेची ओळख असल्याने त्या अनुसरून सर्वांनी काम करावे, असे प्रतिपादन शिवसेना नेते चंद्रकांत खैरे यांनी लातूरला केले.

येथील शासकीय विश्रामगृहावर लातूर जिल्हा शिवसेनेच्या आढावा बैठकीप्रसंगी मार्गदर्शन करताना ते बोलत होते. याप्रसंगी संपर्कप्रमुख माजी आमदार रोहिदास चव्हाण, जिल्हाप्रमुख संतोष सोमवंशी, जिल्हाप्रमुख बालाजी रेड्डी, सहसंपर्कप्रमुख नामदेव चाळक, महिला जिल्हा संघटक सौ.जयश्री उटगे,सौ. सुनीताताई चाळक, महानगर प्रमुख सुनील बसपुरे, डॉ. शोभा बेंजरगे, युवा सेना जिल्हाप्रमुख दिनेश जावळे, राहुल मातोळकर यांच्यासह अन्य पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना चंद्रकांत खैरे यांनी सांगितले की, यापूर्वी माझ्याकडे लातूरची जबाबदारी सोपवण्यात आलेली होती. त्यावेळी आठ नगरसेवक शिवसेनेचे निवडून आलेले होते. भाजपचा एकही नगरसेवक नव्हता. आता पुन्हा त्याच जोमाने सर्वांनी काम करायचे आहे. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी या निवडणुका गांभीर्याने घेतलेल्या आहेत. शिवसैनिक निवडून आला पाहिजे, यासाठी शिवसेनेच्या सर्व नेत्यांवर जबाबदारी सोपवण्यात आली आहे लातूर जिल्ह्यांची जबाबदारी माझ्याकडे देण्यात आली आहे. मी पक्षप्रमुखांनी दिलेले काम करत आहे. स्थानिक पातळीवर आघाडी करण्यासंदर्भातील सर्व निर्णय हे पक्षप्रमुख घेतील. ज्या ठिकाणी आघाडी करावी लागेल त्या ठिकाणी आघाडी होईल. पैशाच्या जोरावर शिवसेना फोडण्यात आली; परंतु आजही लोकांचा विश्वास उद्धव ठाकरे यांच्यावरच असल्याचे ते म्हणाले.

सर्व निवडणुका ताकदीने लढायच्या असून महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषदा, पंचायत समित्या, नगर पंचायत निवडणुकीत शिवसैनिक विजयी झाला पाहिजे, यासाठी काम करायचे आहे. असे आवाहन शिवसेना नेते चंद्रकांत खैरे यांनी केले.

## फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलची ११२ वी शतकोत्तर वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संपन्न



# मी माझ्या आयुष्याचे शेवटचे दिवस बुद्ध धर्माच्या प्रचारातच व्यतीत करण्याचे ठरविले आहे : डॉ. बाबासाहेब आंबेडकर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

छत्रपती संभाजी नगर (प्रतिनिधी) : फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल व दि ऑल इंडिया नाग असोसिएशन (आईना) च्या संयुक्त विद्यमाने फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे जनसंपर्क कार्यालय, ४, साकेत नगर, छत्रपती संभाजी नगर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी २७ मे १९५३ ला परेल, मुंबई येथे म्हटल्याप्रमाणे मी माझ्या आयुष्याचे शेवटचे दिवस बुद्ध धर्माच्या प्रचारातच व्यतीत करण्याचे ठरविले आहे. या विधानाच्या ७२ व्या वर्धापनानिमित्त ११२ वी वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा २५ मे २०२५ ला संपन्न झाली.

फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे संचालक बी. बी. मेश्राम अध्यक्षीय मार्गदर्शन करताना म्हणाले की, वज्जीगणाची भूमिका, चर्चेतून चालणारी तत्त्वज्ञ बेग हॉटची लोकशाही, धम्माची पुनर्स्थापना, संसदीय लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी आवश्यक अटी आणि शर्ती या अनुषंगाने करावयाच्या उपाययोजना याचे स्पष्टीकरण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पुणा लॉ लायब्ररी मध्ये २२ डिसेंबर १९५२ च्या भाषणात दिले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केवळ शिक्षण हे वाघीणीचे दुध नव्हे! तर इंग्रजी शिक्षण हे वाघीणीचे दुध होय. याचे स्पष्टीकरण बहिष्कृत भारतात दिले आहे. त्यांनी बुद्धिष्ट रिलिजियस सेमिनरी स्थापन करायला सांगितले होते किमान धार्मिक क्षेत्रातील व्यक्तींनी तरी हे कार्य पूर्णत्वास नेले आहे काय? एवढेच नव्हे! तर Political power is the master key which can open each and every lock. अर्थात राजकीय शक्ती ही सर्व समस्यांची गुरुकिल्ली आहे, असे म्हटले होते. जे सर्वच मान्य करतात. पण जा आणि आपल्या घराच्या भिंतीवर कोरून ठेवा की, तुम्हाला या देशाची शासनकर्ती जमात व्हायची आहे. असे बाबासाहेब म्हणाले होते. याची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यासाठी कुणीही आपल्या घराच्या भिंतीवर लिहायला तयार नाहीत. तर मग आपणांस जनतेला सल्ला द्यायचा अधिकार आहे काय? मी आपणास ठासून सांगू इच्छितो की, मला तसा अधिकार आहे कारण मी माझ्या घराच्या भिंतीवर तसे लिहिलेले आहे. ते आपण नीट समजून घेणे आवश्यक आहे.

२४ नोव्हेंबर १९५६ ला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बौद्धांचे आद्य कर्तव्य आहे की, त्यांनी दर रविवारी बुद्ध विहारात गेले पाहिजे. तर मग आम्ही दर रविवारी बुद्ध विहारात जातो काय? आणि जात असल्यास नेमके काय करतो? अर्थात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आदेशयुक्त संदेशाचे आपण पालन करीत नसल्यास डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अपेक्षांची पूर्तता कशी करणार आहोत? डॉ. बाबासाहेब आंबेडकर १९४२ पासून बुद्ध जयंतीला सुट्टी मिळावी म्हणून प्रयत्नशील होते. नेहरू सरकारने त्या काळात बुद्ध जयंतीची सुट्टी जाहीर केली होती. परंतु मुंबई सरकार अंमलबजावणी करण्यास उत्सूक नसल्याने नियोजित ५ वाजता होणाऱ्या कार्यक्रमाला ७ वाजता सुरूवात करावी लागली होती. १९५३ साली बुद्ध जयंती २७ मे ला होती. मात्र त्या दिवशी रमाई आंबेडकराचा स्मृतीदिन पण होता. त्याप्रसंगी डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, बौद्ध धर्माचा उपासक या नात्याने मी माझ्या आयुष्याचे शेवटचे दिवस बुद्ध धम्माच्या प्रचारातच व्यतीत करण्याचे ठरविले आहे. याची जाणीव ठेवून समस्या निर्मूलनासाठी उपाययोजना करता यावी म्हणून सदरील विधानाच्या ७२ व्या वर्धापनदिनानिमित्त वर्तमान प्रासंगिकता समजून घेण्यासाठी आपण चर्चा करीत आहोत.

प्रमुख वक्ते म्हणून बोलताना त्रिरत्न बौद्ध महासंघाचे धम्मचारी ललित सिद्धी म्हणाले की, फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या वतीने सुरू असलेल्या प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा हे एक महान कार्य आहे. विचारांना कृतीची जोड नसेल तर ते कर्मकांड ठरते. विचाराचे रुपांतर आचारात झाले तर उच्चारलेल्या शब्दांना किंमत प्राप्त होते. कायद्याचे रक्षकच जेव्हा भक्षक होतात, तेव्हा कायदा व सुव्यवस्था ढासळत असते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा प्रचार करण्याची लागण झालेल्या व्यक्ती प्रसार करू शकतात. ६ डिसेंबर १९५६ ला प्राणज्योत मालवण्यापूर्वी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महत्प्रयासाने बुद्ध आणि त्याचा धम्म या ग्रंथाची प्रस्तावना लिहिली होती. आचरण करण्यासाठी आपण ते समजून घेणे आवश्यक आहे.

याप्रसंगी विलास कटारे म्हणाले की, या देशात भगवदगीता आणि राज्य घटना असेल तर भवितव्य अंधारात असेल हे बाबासाहेब आंबेडकरांनी स्पष्ट केले होते. करिता चार वेद आणि भगवदगीतेतील १८ अध्याय आपण समजून घेतले पाहिजे. गौतम जोगदंड म्हणाले की, आपण एकत्रित येऊन उद्योग धंदे निर्माण केले पाहिजेत. धम्मचारिणी धैर्यसुरी म्हणाल्या की अंधश्रद्धा पसरू नये म्हणून प्रचारकावर फार मोठी जबाबदारी असते. धम्मचारी ललित मुनी म्हणाले की, जनजागृतीचे कार्य सुरू असायला हवे. उद्योजक मिलिंद बागूल म्हणाले की, चैनीत असणाऱ्यांना आपल्या पायाखाली काय कुजत आहे? याची जाणीव नसल्याने ते अंधारात चाचपडत असतात. व्ही. एस. इंगळे म्हणाले की, तमाम मानवाचा कल्याण हा धम्मातच आहे. डी. बी. मेश्राम म्हणाले की, सर्व जनतेने बुद्धीजम स्विकारला पाहिजे. धम्म मित्र सुरेखा गायकवाड म्हणाल्या की, आपल्याकडे उपलब्ध असणाऱ्या वेळ, पैसा, संसाधनाचा वापर विचाराच्या प्रचारासाठी केला पाहिजे. अशोक मेश्राम म्हणाले की, संसाराची तमा न बाळगता त्यांनी समाजकार्य केले आहे. आपले आयुष्य संपत चालले असताना एखाद्या व्यक्तीला तरी आपण धम्माकडे वळविले आहे काय?

प्रास्ताविकेत एड. विलास रामटेके म्हणाले की, एका माणसाने दुसऱ्या माणसांशी उचित व्यवहार करणे म्हणजे धम्म होय. सुत्रसंचालन उद्योजक मिलिंद बागूल यांनी केले. सुरुवातीला आदर्शांना मान्यवरांच्या हस्ते पुष्पमाला अर्पण करण्यात आल्या तर स्टडी सर्कलच्या वतीने उपस्थितांचे स्वागत करण्यात आले. या कार्यशाळेचे उद्घाटन उद्योजक राजू सोनवणे यांनी केले. या कार्यशाळेला धम्मचारी विशुद्धसिद्धी, गौतम जोगदंड, उद्योजक मिलिंद बागूल, विलास कटारे, धम्मचारिणी धैर्यसुरी, धम्मचारिणी क्षांतीचित्ता, धम्मचारी ललितसिद्धी, धम्मचारी शांतीवीर, सुनिल वाकेकर, उद्धव बनसोडे, एड. डी. बी. मेश्राम, सुरेखा गायकवाड, अशोक मेश्राम इत्यादी प्रतिनिधी उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## थोडक्यात...

### ट्रॅव्हल्सच्या डिग्गी मधून अज्ञात चोरट्याने प्रवासीच्या बॅगसह रक्कम पळवली

सोलापूर, (प्रतिनिधी) : शिर्डी ते सोलापूर प्रवासादरम्यान शिवबाबा ट्रॅव्हल्स क्रमांक एमएच..१३.बी.क्यू.५०७३ या बसच्या पाठीमागील डिग्गी मधून फिर्यादी नागालक्ष्मी नारायण दत्तू (वय-४०,रा.जिल्हा येलूर आंध्र प्रदेश) यांची बॅग व कपडे तसेच रक्कम असा एकूण ४३ हजारांचा ऐवज चोरून नेल्याची फिर्याद फौजदार चावडी पोलीस ठाण्यात दिली आहे. दंतु यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना ३० मे रोजी शिर्डी ते सोलापूर प्रवासादरम्यान घडली. या घटनेचा पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल परीट हे करीत आहे.

### बस मध्ये चढताना पावणे पाच लाखांचे दागिने लंपास

सोलापूर, (प्रतिनिधी) : सोलापूर बस स्टॅन्ड वरून डोंबिवली या ठिकाणी येण्यासाठी बसमध्ये फिर्यादी परमेश्वर नरसप्पा बेळे (वय-५९,रा.मनोहर भागवत बिल्डिंग,तुकाराम नगर आयरे रोड,डोंबिवली पूर्व) चढत असताना अनोळखी दोन इसमांनी त्यांना बोलण्यात गुंतवून त्यांचे बॅग फाडून ४ लाख ७६ हजार ७०० रुपये किमतीचे दागिने चोरून नेले आहे. याप्रकरणी बेळे यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून, त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात दोन चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. ही घटना २१ मे रोजी सकाळी साडेनऊ वाजण्याच्या सुमारास सोलापूर ते डोंबिवली बस मध्ये घडली. या घटनेचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक धायगुडे हे करीत आहेत.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य सर्वांना प्रेरणादायी: उच्च शिक्षणमंत्री चंद्रकांतदादा पाटील

## सोलापूर विद्यापीठात अहिल्यादेवींच्या त्रिशताब्दी जयंतीनिमित्त विविध उपक्रम!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : रणरागिणी, राजमाता, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी सबंध भारतभर बारा हजाराहून अधिक मंदिरांचा जिर्णोद्धार केला. पाण्यासाठी पाणवठे तसेच बारवे निर्माण करून जलव्यवस्थापनाचे उत्कृष्ट कार्य केले. त्यांचा आदर्श राज्यकारभार, युद्धनीती, न्यायव्यवस्था यातून सर्वांनाच प्रेरणा मिळते, असे गौरवोद्गार राज्याचे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री श्री चंद्रकांतदादा पाटील यांनी काढले.

**उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांतदादा पाटील म्हणाले की, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य मोठे असून त्यांच्या कार्याचा गौरव व सन्मान केंद्र व राज्य सरकारकडून त्रिशताब्दी जयंतीनिमित्त करण्यात येत आहे. २०१९ मध्ये सोलापूर विद्यापीठास पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव देऊन एक प्रकारचा सन्मान तत्कालीन सरकारकडून करण्यात आला. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांना सासरे मल्हारराव होळकर यांच्याकडून चांगली शिकवण मिळाली. पुढे त्या राज्यकारभारात व न्यायदानात पारंगत झाल्या. विद्यापीठाने त्यांच्या विचारांचा व कार्याचा वारसा पुढे घेऊन जाताना त्यांच्या नावाप्रमाणे साजेशे कारभार करावे. विविध नवनवीन कोर्सेस सुरू करावेत. बांधकामास व विद्यापीठाच्या विविध कामास कसलाही निधी कमी पडू देणार नाही, असे आश्वासनही त्यांनी यावेळी दिले.**

शनिवारी, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठामार्फत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीनिमित्त विद्यापीठात आयोजित विविध कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील बोलत होते. यावेळी व्यासपीठावर राज्याचे ग्राम विकास, पंचायतराज मंत्री व सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार रणजीतसिंह मोहिते-पाटील, कुलगुरू प्रा. डॉ. प्रकाश महानवर, महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओंबासे, प्र-कुलगुरू प्रा. लक्ष्मीकांत दामा, प्रभारी कुलसचिव डॉ. अतुल लकडे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर अध्यासन केंद्राचे संचालक डॉ. प्रभाकर कोळेकर यांनी केले. यावेळी पीएम उषा योजनेतून दोन नवीन इमारतींचा पायाभरणी समारंभ तसेच विविध स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थी, कर्मचाऱ्यांचा यावेळी मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीच्या शुभेच्छा देऊन विद्यापीठातील अहिल्यादेवींच्या स्मारकाचे काम १५ जुलैपर्यंत पूर्ण होईल, असे सांगितले. एक भव्य स्मारक येथे उभा राहत असून यातून सर्वांनाच प्रेरणा मिळेल. अहिल्यादेवी होळकर यांचे काम संपूर्ण देशात आदर्शवत असे आहे. संपूर्ण देशात हिंदू मंदिरांचा त्यांनी जिर्णोद्धार केला. हिंदू संस्कृती जोपासण्याचे काम त्यांच्या हातून झाले. आज देशात त्यांच्या आदर्श विचारांचा व कार्याचा जागर त्रिशताब्दी जयंतीनिमित्त सुरू आहे. अहिल्यादेवींच्या आदर्श समाजव्यवस्था, न्यायव्यवस्थेचे अनुकरण आजचा पिढीने केले पाहिजे. विद्यापीठाच्या नवीन प्रशासकीय इमारतीकडे जाणाऱ्या रस्त्याच्या कामासाठी निधी मंजूर केला आहे. रस्त्याचे कामही लवकरच पूर्ण होईल, असेही पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी यावेळी सांगितले.

कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर म्हणाले की, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे आदर्श विचार व कार्य डोळ्यासमोर ठेवून विद्यापीठाची वाटचाल सुरू आहे. आज



विद्यापीठाची विद्यार्थिनी भुवनेश्वर जाधव हिने कराटे स्पर्धेत आंतरराष्ट्रीय पातळीवर कांस्यपदक पटकाविले. १५४ हून अधिक कौशल्य विकासाचे कोर्सेस विद्यापीठात सुरू आहेत. त्याचबरोबर पंढरपुरात आंतरराष्ट्रीय वारकरी संशोधन केंद्र सुरू करण्या संदर्भात शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. तृतीयपंथी तसेच दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी सोयी सुविधा केंद्र देखील सुरू करण्याचा विद्यापीठाचा मानस आहे.. यासाठी शासनाकडून मदत मिळण्याची अपेक्षा कुलगुरू प्रा. महानवर यांनी यावेळी व्यक्त केली.

महानगरपालिकेचे आयुक्त सचिन ओंबासे यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे प्रशासकीय कार्य लोकाभिमुख होते, असे सांगून प्रशासनात आजही त्यांच्या कार्याचा पगडा आहे, असे सांगितले. या कार्यक्रमास व्यवस्थापन परिषदेचे सदस्य राजाभाऊ सरवदे, सिनेट सदस्य तथा भाजपच्या शहर अध्यक्ष रोहिणी तडवळकर, जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण, मोहन डांगरे, सिनेट सदस्य प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे, गणेश डोंगरे, यतीराज होनमाने, अहिल्यादेवी होळकर स्मारक समितीचे सदस्य अमोल कारंडे, माऊली हळणवर यांच्यासह विद्यापीठ विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. केदारनाथ काळवणे, विद्यापीठ अभियंता गिरीश कुलकर्णी, विविध प्राधिकरणाचे सदस्य, शिक्षक, अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. तेजस्विनी कांबळे व प्रा. श्रुती देवळे यांनी केले.

# पंढरीत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती उत्साहात साजरी

## पालकमंत्र्यांसह, आमदार, पदाधिकारी आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांची उपस्थीती



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनीधी :पंढरपूर शहर आणि तालुका मध्यवर्ती राजमाता, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर मध्यवर्ती जयंती महोत्सव समिती यांच्या वतीने पंढरपूर येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांच्या जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

यावेळी राज्यांचे ग्राम विकास आणि पंचायतराज मंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री ना.जयकुमार गोरे यांनी उपस्थिती राहून राजमाता, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची आरती केली व त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले.

### सर्व धनगर समाजातील डॉक्टरकडून एकाच वेळी उपस्थिती

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती सोहळ्याच्या निमित्ताने भारतीय जनता पार्टीच्या वतीने देशभर राज्यभर मंडलनिहाय जयंती साजरी करून अहिल्यादेवींच्या विचाराचे उदात्तीकरण केले त्याबद्दल मंडळाच्या वतीने पालकमंत्री जयकुमार गोरे यांचा धनगर समाजाचे प्रतीक असलेली घोंगडी व काठी देऊन सन्मान केला.

यावेळी भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार_सावंत, किसान मोर्चा प्रदेश सचिव माऊली हळणवर, मध्यवर्ती मंडळाचे अध्यक्ष सोमनाथ ढोणे, उपाध्यक्ष प्रवीण सलगर, श्रीकांत दादा देशमुख, पंकज देवकते, प्रशांत घोडके, प्रसाद कोळेकर यांच्यासह मोठ्या संख्येने बहुजनसमाज बांधव ज्येष्ठ नागरिक, माता-भगिनी, युवा बांधव, शेतकरी बांधव, सामाजिक कार्यकर्ते, पदाधिकारी-कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या जयंतीनिमित्त अनेक नेत्यांनीही उपस्थित राहुल पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्यास अभिवादन केले. यामध्ये माजी आमदार प्रशांतराव परिचारक, आ. समाधान आवताडे, आ. डॉ बाबासाहेब देशमुख, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते अनिल सावंत, मनसेचे नेते दिलीप धोत्रे, सहकार शिरोमणी चे चेअरमन कल्याणराव काळे, व्हा.चेअरमन भारत कोळेकर, जिल्हा परिषद सदस्य सुभाषराव माने, प्रांताधिकारी सचिन इथापे, तहसीलदार सचिन लंगोटे, पंढरपूर शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक विश्वजीत घोडके, पंचायत समितीचे गटविकास अधिकारी संसारे यांचे सह पंढरपूर शहर आणि ग्रामीण भागातील विविध प्रशासकीय विभागाचे अधिकारी, विविध राजकीय पक्षाचे पदाधिकारी विविध संस्थांचे पदाधिकारी यांनी उपस्थित राहून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांना अभिवादन केले.

अहिल्यादेवी होळकर पुतळ्याचे जवळ दिवसभर रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. मोफत नेत्र तपासणी आणि मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीर यासह विविध कार्यक्रम अहिल्यादेवी होळकर मध्यवर्ती जयंती महोत्सव समितीच्या वतीने आयोजित करण्यात आले होते.

# इंदापूरच्या आश्रमशाळेत लोककल्याणकारी राजमाता अहिल्याबाई होळकर यांची जयंती साजरी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी/अतुल सोनकांबळे : मातोश्री रमाबाई आंबेडकर विद्यार्थी वसतिगृह ट्रस्ट संचलित प्राथमिक,माध्यमिक, उच्च माध्यमिक आश्रमशाळा तसेच मुलांचे व मुलींचे अनुदानीत वसतिगृह यांच्या संयुक्त विद्यमाने संस्थेच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर शैक्षणिक संकुलात आत्मप्रतिष्ठा जपत शेवटच्या क्षणापर्यंत न्यायाने वागून अजरामर झालेल्या शौर्यशाली, धैर्यशाली, लोक कल्याणकारी राजमाता अहिल्याबाई होळकर यांची ३०० वी जयंती साजरी करण्यात आली.

संस्थेचे उपाध्यक्ष तानाजी मिसाळ यांच्या हस्ते तथागत गौतम बुद्ध मूर्तीस व राजमाता अहिल्याबाई होळकर, माजी नगराध्यक्ष रत्नाकर मखरे (तात्या)यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

संस्थेचे सचिव ड.समीर मखरे, मुख्याध्यापक साहेबराव पवार, नानासाहेब सानप,प्रा.संतोष चोरमले, सतीश कोल्हे, मनिषा जगताप - मखरे,अधिक्षक अनिल ओहोळ, अनिसा मुल्ला, लता सातपुते, निता भिंगारदिवे व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती निमित्त करमाळा भाजपकडून कमलादेवी मंदिराची स्वच्छता

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त भारतीय जनता पार्टीच्या वतीने संपूर्ण महाराष्ट्र राज्यात विविध ठिकाणी स्वच्छता अभियान व इतर कार्यक्रम राबवण्यात आली होते. या निमित्ताने आज करमाळा भाजपकडून करमाळ्याची कुलस्वामिनी आई कमलाभवानी मंदिराची स्वच्छता करण्यात आली.

यावेळी भाजपचे तालुका अध्यक्ष काकासाहेब सरडे मनाली की, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त भारतीय जनता पार्टीच्या वतीने अनेक विविध उपक्रम राबवले गेले. यामध्ये आम्ही निबंध स्पर्धा व मंदिर स्वच्छता अभियान राबवले. या माध्यमातून सर्व ठिकाणची हिंदू मंदिरे हे स्वच्छ आणि पवित्र राहतील असा संदेश या निमित्ताने देण्याचा प्रयत्न केला आहे. हे कार्य पंतप्रधान नरेंद्र मोदी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाने आमचे नेते गणेश चिवटे यांच्या नेतृत्वात हा कार्यक्रम घेतला असल्याने तालुका अध्यक्ष काकासाहेब सरडे ,यांनी सांगितले.

या कार्यक्रमाप्रसंगी जिल्हा उपाध्यक्ष अफसर जाधव, रामभाऊ ठाणे जगदीश अग्रवाल भ्रमाचार्यचाने सर राजेश पाटील, प्रकाश ननवरे, अभिषेक चिंचकर शंभुनाथ नेरुळकर जनार्दन पवळ नितीन पोवळ, बाबा निकम, भैया दळवी, नारायण, गुरुदास घाडगे, रणजीत पवार, किरण बागल, गजानन घाडगे, नाना अंडरसे लक्ष्मण काळे, संतोष जवळकर, मोहन शिंदे भगवान गिरी गोसावी, पत्रकार दिनेश मडके, राजू सय्यद गणेश महाडिक,अजिनाथ सुरवसे, लक्ष्मण शेंडगे, जयंत काळे, बापू मोहोळकर, विष्णू रंधवे ,हर्षद गाडे, हर्षल शिंगाडे, दादा देवकर, प्रवीण बिनवडे, अण्णा गुडघे सनी माने, शैलेश राजमाने, अनिकेत शिरसागर, अक्षय शहा, राजेश पाटील, शिंदे भरत गुंड, अजिनाथ जगदाळे, यांच्यासह भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.





### सहा जणाविरुद्ध इंदापूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

### कीटकनाशकाची पावडर खाऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न

# लग्नात मानपान मिळाला नसल्याने आई-वडिलांकडून दोन तोळ्याची अंगठी घेऊन येण्याच्या मागणीसाठी नवविवाहितेचा छळ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी/अतुल सोनकांबळे : लग्नात मानपान मिळाला नसल्याने आई-वडिलांकडून दोन तोळ्याची अंगठी घेऊन येण्याच्या मागणीसाठी नवविवाहितेचा छळ करत असल्याच्या आरोपावरून तिच्या नवऱ्यासह सहा जणांविरुद्ध मंगळवारी (दि.२७) इंदापूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.




नितीन अर्जुन देवकर, साखरबाई अर्जुन देवकर (दोघे रा. रेडा), अश्विनी राहुल गायकवाड, राहुल आप्पा गायकवाड (दोघे रा.ओझरे), लता अनिल शिंदे, अनिकेत अनिल शिंदे (दोघे रा. न्हावी) अशी आरोपींची नावे आहेत. स्वाती नितीन देवकर (वय २१, रा. रेडा) असे तक्रार देणाऱ्या विवाहितेचे नाव आहे.

पोलिसांनी सांगितले की, मागील वर्षी १ मे रोजी स्वातीचे नितीनशी लग्न झाले. जानेवारी २०२५ पासून तिची नणंद अश्विनी गायकवाड, तिचा नवरा राहुल, दुसरी नणंद लता अनिल शिंदे हे रेडा येथे आल्यानंतर स्वातीचा नवरा नितीन व सासू साखरबाई यांना स्वातीला त्रास द्यायला सांगत असल्याने कोणत्याही कारणावरून नवरा व सासू स्वातीला त्रास देत असत.

त्यानंतर जर तुला नांदायचे असेल तर तू तुझ्या आई-वडिलांकडून दोन तोळ्याची अंगठी घेऊन ये, अशी मागणी नितीनने केली. त्यासाठी स्वातीचा छळ होऊ लागला. मोबाइल घेतल्याच्या कारणावरून अनिकेत शिंदे याने स्वातीला मारहाण केल्याची घटना १३ मेला घडली. अश्विनी गायकवाड व राहुल गायकवाड यांनीही वेळोवेळी दोन तोळ्याची अंगठी घेऊन ये, असे म्हणून शिवीगाळ व दमदाटी केली. अनिकेतने मारहाण केल्यानंतर, बहिणींना का बोलतेस म्हणून नितीनने मारहाण केली. त्यामुळे स्वातीने कीटकनाशकाची पावडर खाऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला.

# लोकाभिमुख प्रशासनात सोलापूर जिल्हा राज्यात सर्वोत्कृष्ट असला पाहिजे : महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

## जिल्ह्यातील २०६६ भूमिहीनांपैकी २५२ भूमीहिनांना घरकुलासाठी जमीन वाटप

**आठवड्यातून किमान एक वेळ तहसीलदार यांनी महसुली गावात जाऊन तेथील लोकांशी चर्चा करावी, त्यांचे प्रश्न, समस्या ऐकून घेऊन त्यांच्याशी संवाद साधावा. त्यातून त्यांचे प्रश्न सोडावे, असा जनसंवादाचा सोलापूर पॅटर्न तयार करावा**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/जिमाका : राज्य शासनाच्या फ्लॅगशिप उपक्रम व योजनांची महसूल अधिकारी कर्मचारी यांनी सविस्तर माहिती घेऊन त्याची प्रभावी अंमलबजावणी करावी. जिल्ह्यातील सर्व महसूल अधिकारी कर्मचाऱ्यांनी पुढील सहा महिन्यात महसूल अंतर्गत ची सर्व कामे अत्यंत पारदर्शकपणे करून संपूर्ण राज्यात सोलापूर हा सर्वोत्कृष्ट महसुली जिल्हा झाला पाहिजे यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन महसूल




मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले.

नियोजन समिती सभागृहात आयोजित महसूल विभागाच्या आढावा प्रसंगी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे बोलत होते. यावेळी आमदार देवेंद्र कोठे, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, अपर जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकुर, निवासी उपजिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी, उपजिल्हाधिकारी महसूल संतोषकुमार देशमुख, तहसिलदार श्रीकांत पाटील, तहसिलदार दिनेश पारगे यांच्या सह सर्व उपविभागीय अधिकारी व तहसीलदार उपस्थित होते.

महसूल मंत्री श्री बावनकुळे पुढे म्हणाले की, महसूल अधिकाऱ्यांनी विशेषत: तहसीलदार यांनी प्रत्येक आठवड्यातील किमान एक दिवस एका गावात जाऊन तेथील लोकांशी संवाद साधावा. त्या लोकांना शासकीय योजनांची माहिती द्यावी. त्यांचे काही प्रश्न व समस्या असतील त्या ऐकून घ्याव्यात त्या सोडवण्यासाठी तात्काळ कार्यवाही करावी. हे शासन प्रशासन पारदर्शक व गतिमान असून अशा पद्धतीने लोकात मिसळून त्यांचे प्रश्न समस्या ऐकून त्यावर कारवाई केल्यानंतर ते अधिक लोकाभिमुख होईल. त्यांचा प्रशासनावरील विश्वास अधिक दृढ होईल. त्यामुळे अधिकाऱ्यांनी जनसंवादाचा हा सोलापूर पॅटर्न तयार करून संपूर्ण राज्यासाठी पथदर्शक ठरेल या पद्धतीने काम करावे, असे आवाहन त्यांनी केले.

प्रत्येक तहसीलदार, प्रांत अधिकारी यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रात किमान एक नाविन्यपूर्ण काम करावे व त्याचा लाभ सर्वसामान्य नागरिकांना मिळवून द्यावा. त्याप्रमाणे आपल्या कार्यक्षेत्रात राबवलेल्या नाविन्यपूर्ण योजना राज्यासाठी दिशादर्शक ठरतील यासाठी प्रयत्न करावेत व तशा योजना असतील तर त्या योजना राज्यस्तरावर पाठवाव्यात, त्या महसुल विभागाच्या वतीने संपूर्ण राज्यात राबविण्याबाबत त्यावर सकारात्मक विचार करण्यात येईल, अशी माहिती महसूल मंत्री श्री. बावनकुळे यांनी दिली. त्याचप्रमाणे महसूल विभागातील अधिनियम, कायदे आजच्या काळानुसार नसतील व त्यात काही ठिकाणी बदल आवश्यक असतील तर तसे अभ्यासपूर्ण बदल करण्याबाबतचे प्रस्ताव महसूल विभागाला द्यावेत, त्यात बदल करण्याबाबत सकारात्मक कार्यवाही करण्यात येईल असेही त्यांनी नमूद केले.

गौण खनिज अंतर्गत सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी दंड व फौजदारी कारवाई एकत्रितपणे केली पाहिजे तरच वाळू चोरावर वचक बसेल. दंड वसूल करणे या ऐवजी फौजदारी कारवाई करून गौण खनिज उत्खनन चुकीच्या पद्धतीने होणार नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे. प्रशासनाने ४१३ लोकांवर जी दंडात्मक कारवाई केली आहे त्याऐवजी त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करावेत. शासनाच्या ३ एप्रिल २०२५ च्या शासन निर्णयानुसार घरकुल योजनेच्या लाभार्थ्यांना त्यांच्या घरी जाऊन तलाठी यांनी पाच ब्रास वाळू दिली पाहिजे. तसेच रॉयल्टी प्रमाणपत्र देत असताना त्यावर संबंधित लाभार्थ्यांनी वाळू कोठून घ्यायची याचीही नोंद असली पाहिजे. लाभार्थ्यांना महसूल आपल्या दारी आले आहे याची जाणीव झाली पाहिजे सूचना महसूल मंत्री श्री बावनकुळे यांनी दिल्या.

अपार, जीवंत सातबारा तसेच शंभर दिवस कार्यक्रम अंतर्गत प्रशासनाने केलेल्या कामांचे महसूल मंत्री श्री. बावनकुळे यांनी कौतुक करून पुढील काळातही याच पद्धतीने पारदर्शक व गतिमान काम करून सर्वसामान्य नागरिकांना लाभ मिळवून द्यावा. तहसीलदार प्रांताधिकारी यांनी अर्धन्यायिक प्रकरणे त्वरित निकाली काढावेत जास्तीत जास्त दोन तारखा देऊन प्रकरणे मेरिटवर निकाली निघतील यासाठी प्रयत्न करावेत. तसेच पाणंद रस्त्यासाठी नागपूर पॅटर्न जिल्ह्यात राबवावा. यासाठी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून १२ फूट रुंद व एक किलोमीटर लांब रस्त्यासाठी दहा लाखाचा निधी देण्यात येतो. यासाठी प्रयत्न करून जास्तीत जास्त रस्ते कामे मार्गी लावावी असे आवाहन त्यांनी केले.

जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या वतीने करण्यात येत असलेल्या कामकाजाची सविस्तर माहिती बैठकीत दिली. यामध्ये गौण खनिज वसुली ९७ कोटी झाली असल्याचे सांगून नवीन शासन निर्णयाप्रमाणे नवीन वाळूधरणार नुसार जिल्ह्यात नऊ वाळू गटाची टेंडर प्रक्रिया लवकरच सुरू होणार असल्याचे सांगितले. जिल्ह्यातील २०६६ भूमिहीनांपैकी २५२ भूमीहिनांना घरकुलासाठी जमीन वाटप करण्यात आलेले असून उर्वरित सर्वांना २० जून पर्यंत जमीन वाटप केले जाणार आहे. महाराज स्वाभिमान अंतर्गत १३४ शिबिरे घेण्यात आलेली असून विद्यार्थ्यांना त्वरित दाखल्यांचे वाटप करण्यात आलेले आहे.

राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत

# डाळिंब पिकासाठी अँटीहेलनेट कव्हर तंत्रज्ञानाच्या लाभासाठी शेतकऱ्यांनी अर्ज करावे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/जिमाका : डाळिंब हे महाराष्ट्रातील कोरडवाहू प्रक्षेत्रावर येणारे अतिशय महत्वाचे फळपिक आहे. डाळिंब उत्पादक शेतक-यांना अवकाळी पाऊस, गारपीट अशा नैसर्गिक आपत्तींना सतत सामोरे जावे लागते. त्यामुळे शेतक-यांना दर्जेदार व निर्यातक्षम डाळिंब पिकाचे उत्पादन घेण्यास मर्यादा येत आहेत. अवेळी पाऊस व गारपीट अशा नैसर्गिक आपत्तीपासून डाळिंब बागांच्या संरक्षणासाठी अँटीहेलनेट कव्हर घटकाचा शासकीय योजनेतर्गत समावेश करण्याबाबत शेतकरी तसेच लोकप्रतिनीधीच्दारे सातत्याने मागणी होती.

सोलापूर जिल्हयास सन २०२५-२६ साठी भौतिक ३१.०० हे. व आर्थिक र.रु.१६४.५५ लाख कार्यक्रम राबविण्यास मान्यता मिळाली असून, त्यानूसार राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत डाळिंब पिकासाठी ॲटीहेलनेट कव्हर या घटकाची प्रमुख डाळिंब उत्पादक जिल्ह्यामध्ये महाडीबीटी प्रणालीवर अंमलबजावणी करण्यात येत आहे.

योजनेचा उद्देश :- गारपीट व अवकाळी पाऊस यापासून डाळिंब बागांचे संरक्षण करणे. शेतक-यांना उच्च दर्जाच्या व उच्च प्रतिच्या निर्यातक्षम डाळिंब पिकांच्या उत्पादनासाठी आर्थिक सहाय्य करणे. फळबागांकरीता आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याकरीता प्रोत्साहन देणे. ग्रामीण भागातील युवकांना कृषि क्षेत्राल स्वयंरोजगार उपलब्ध करून देणे.

योजनेची व्याप्ती- डाळिंब उत्पादक १३ जिल्हे अहमदनगर, पुणे, सोलापूर, नाशिक, धुळे, जळगाव,सातारा, सांगली, औरंगाबाद, बीड, जालना, उस्मानाबाद, बुलडाणा

क्षेत्र मर्यादा २० गुंटे ते १ एकर दरम्यान प्रति लाभार्थी लाभ देय राहील.

खर्चाचे मापदंड रु.४,२४,६४०/- प्रती एकर

अनुदान मर्यादा रु.२,१२,३२०/- प्रती एकर (खर्चाच्या ५० टक्के)

योजनेच्या अधिक माहितीसाठी कृषि विभागाचे संकेस्थळ http://krishi maharashtra.gov.in

नजिकच्या कृषि विभागाच्या कार्यालयाशी संपर्क साधावा.

आवश्यक कागदपत्रे ॲग्रीस्टॅक फार्मर आय डी, ७/१२ (डाळिंब पिकाच्या नोंदीसह), ८-अ. आधार कार्डाची छायांकित प्रत, आधार संलग्न बँक खात्याचा पासबुकच्या प्रथम पानाची छायांकित प्रत, जात प्रमाणपत्र (अनु. जाती/अनु.जमाती शेतक-यांसाठी), विहित नमुन्यातील हमीपत्र, बंधपत्र, चतुःसीमा नकाशा.

योजनेत सहभागी होण्यासाठी सदर घटकाचा लाभ घेण्यासाठी सर्व प्रवर्गातील शेतक-यांनी महाडीबीटी पोर्टलवर https://mahadbt.maharashtra.gov.in/Farmer/griLogin या संकेस्थळावर जास्तीत जास्त शेतक-यांनी या घटकासाठी अर्ज करावेत असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, शुक्राचार्य भोसले, यांनी केले आहे.

# मसिकपाळीतील स्वच्छता ही आरोग्याची गुरु किल्ली : डॉ. सुकेशनी बाळी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : मासिक पाळी प्रत्येक मुली, तरूणी व महिलांच्या आयुष्यातील महत्वाचा भाग आहे. सामान्यत:हा दर महिन्याला एक मासिक पाळी चक्र प्रत्येक मुलीच्या आयुष्यात असते. काहींना या काळात खूप त्रास होतो. पण मुख्य म्हणजे मासिक पाळीच्या त्या ४-५ दिवसांत आरोग्याची व एकंदर स्वच्छतेची काळजी घेणे अतिशय गरजेचे असते. या दरम्यान मुलींनी काही निष्काळजीपणा केल्यास आरोग्याच्या अनेक समस्या उद्भवू शकतात. मुलींना मासिक पाळीशी संबंधित अचूक माहिती असणे अत्यंत आवश्यक आहे. मासिक पाळी दरम्यान सॅनिटरी नॅपकिन किंवा मेन्स्टुअल कप चा वापर करावा. मासिक पाळीत स्वच्छता ठेवल्यास महिलांचे आरोग्य चांगले राहते म्हणूनच मासिक पाळीतील स्वच्छता ही आरोग्याची गुरुकिल्ली आहे असे प्रतिपादन माहेर नर्सिंग होमच्या स्त्रीरोग व प्रसूती शास्त्रतज्ञ डॉ. सुकेशनी बाळी यांनी केले.

त्या अथर्व ज्ञानपीठ प्रतिष्ठान, कोल्हापूर, फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखा व श्री. गणेश कोचिंग क्लासेस यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक मासिक पाळी स्वच्छता दिनानिमित्त प्रबोधन व सॅनिटरी नॅपकिन वाटप कार्यक्रमात प्रमुख पाहुण्या म्हणून बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गणेश कोचिंग क्लासेसचे प्रा. गणेश डोके हे होते. तर व्यासपीठावर स्त्रीरोग व



प्रसूती शास्त्रतज्ञ डॉ. लक्ष्मी बागल, भावना श्रीचीप्पा,आफ्रिन शेख, फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखेचे कार्यक्रम अधिकारी वीरेंद्र परदेशी, कल्पना गडगडे, मनीषा चव्हाण आदी उपस्थित होते. मासिक पाळी विषयी मुलींच्या मनात अनेक प्रश्न होते. मुलींना जी माहिती होती ती शास्त्रोक्त नव्हती त्यामुळे डॉ. लक्ष्मी बागल यांनी मुलींनी विचारलेल्या प्रश्नांना समर्पक उत्तरे देऊन त्यांचे गैरसमज दूर केले. या वेळी १५० मुलींना सॅनिटरी नॅपकिनचे वाटप करण्यात आले. सूत्रसंचालन कल्पना गडगडे यांनी केले. स्वागत व प्रास्ताविक वीरेंद्र परदेशी यांनी केले तर आभार मनीषा चव्हाण यांनी मांडले.

**एकाचवेळी ७० सेवानिवृत्त शिक्षकांचा सन्मान करणारी जिल्ह्यातील पहिली कर्मचारी पतसंस्था**

# खरे व्यक्तिमत्व म्हणजे आपल्यात दडलेल्या सुप्त क्षमता : एजाज शेख

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : सध्याच्या धावपळीच्या युगात माणसाला स्वतःकडे लक्ष द्यायला वेळ नाही. स्वतःच्या कॉलिटीकडे लक्ष दिले तर सगळेच आपल्याजवळ येतात. माणसात अठरा हजार गुणवैशिष्ट्ये असतात.ज्या राष्ट्रात माणसं घडविली जातात तोच देश प्रगतीपथावर जातो.ओरिजनल(खरे)व्यक्तिमत्व म्हणजे आपल्यात दडलेल्या सुप्त क्षमता असल्याचे प्रतिपादन इफरा इन्स्टिट्यूट ऑफ पर्सनॅलिटी डेव्हलपमेंटचे अध्यक्ष एजाज शेख यांनी निफाड तालुका माध्यमिक शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या सेवापूर्ती सत्कार समारंभाप्रसंगी बोलतांना केले.

यावेळी व्यासपीठावर संस्थेचे संस्थापक शिक्षक नेते शिवाजीराव निरगुडे, संस्थापक अध्यक्ष कैलास भारती, अध्यक्ष खा. भास्करराव भगरे, उपाध्यक्ष बाळकृष्ण वाजे, कार्यवाहक राहुल दवते संचालक रामराव बनकर, बाळासाहेब सोनवणे, नगरसेवक




साहेबराव बर्डे, बाळासाहेब गुंजाळ, गणेश महाले,किरण जाधव, भगीरथ सोनवणे, हेमलता जाधव, सोनाली होळकर, महेंद्रसिंग राजपूत,बाळकृष्ण शिंदे,एन.डी. एस.टी चे संचालक समीर जाधव आदी होते.

> **सभासदांसाठी व समाजासाठी सदैव नवनवीन उपक्रम राबवणारी निफाड तालुका माध्यमिक शिक्षक पतसंस्था ही एकाचवेळी तब्बल ७० सेवानिवृत्त शिक्षकांचा सन्मान करणारी जिल्ह्यातील पहिली पतसंस्था ठरली आहे.**

संस्थेचे अध्यक्ष खासदार भास्करराव भगरे यांनी संस्था राबवीत असलेल्या नवनवीन उपक्रमांबद्दल माहिती देवून तसेच संस्थेचा उल्लेखनीय आलेख उपस्थितांना सांगितला. तसेच सर्वांना विश्वासात घेऊन संस्थेचे कामकाज सुरु असल्याचेही सांगितले.

याप्रसंगी पतसंस्थेच्या वतीने तालुक्यात सर्वप्रथम तब्बल सत्तर सेवानिवृत्त शिक्षकांचा ट्रॉपी, बुके, शाल देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

यावेळी संस्थापक शिवाजीराव निरगुडे, बाळकृष्ण ठोके, मंदाकिनी कतवारे, अंबादास पाटील, मधुकर बोडके आदींनी संस्थेबद्दल मनोगतातून शब्दसुमानांची उधळण केली.

यावेळी माजी संचालक दत्ताराम थेटे, भालचंद्र सूर्यवंशी, संतोष बिऱ्हाडे आदींसह मुख्याध्यापक नितीन कडलग, सुनील होळकर, महेश खैरनार, नितीन डोखळे, महेश अहिरे, सुभाष खाटेकर, डी.बी.वाघ, संतोष गोरवे, सी.एस.वाघ, दिलीप कुंभार्डे, एम.एस.माळी, वैभव कर्डिले, परवेज शेख, मुकुंद जाधव, सुजाता कुशारे, अनिता काळे, नलिनी शिंदे, व्यवस्थापक रतन दिवटे, सेवक ज्ञानेश्वर धाटबळे आदींसह सभासद मोठया संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे अध्यक्ष खासदार भास्करराव भगरे, सूत्रसंचालन भालचंद्र सूर्यवंशी, संतोष बिऱ्हाडे यांनी केले तर आभार कार्यवाह राहुल दवते यांनी मानले.

महाराष्ट्र शासन

**औद्योगिक प्रशिक्षण संस्था, अक्कलकोट, जि. सोलापूर.**

म्हाडा कॉलनी जवळ, स्टेशन रोड, अक्कलकोट.

e-mail : itisoakt@yahoo.com websire http://www.dvet.gov.in

Industrial Training Institute

**या संस्थेत प्रवेश सत्र ऑगस्ट २०२५ करीता खालील व्यवसायामध्ये ONLINE पध्दतीने प्रवेश सुरु**

**प्रवेश सत्र ऑगस्ट २०२५**

| अ.क्र. | व्यवसाय (ट्रेड) चे नाव | कालावधी | किमान शैक्षणिक पात्रता | उपलब्ध जागा |
|---|---|---|---|---|
| १. | ड्रेसमेकींग | १ वर्ष | SSC पास/नापास | 20 |
| २. | संधाता (वेल्डर) | १ वर्ष | SSC पास/नापास | 40 |
| ३. | पंप ऑपरेटर कम मेकॅनिक | १ वर्ष | SSC पास | 20 |
| ४. | जोडारी (फिटर) | २ वर्ष | SSC पास | 20 |
| ५. | वीजतंत्री (ईलेक्ट्रीशयन) | २ वर्ष | SSC पास | 40 |
| | | | एकुण जागा | 140 |

*** वैशिष्टये ***

| | | | |
|---|---|---|---|
| १. | प्रवेश गुणवत्तेवर व शासकीय नियमा नुसार दिले जातील. | ८. | परिक्षा उत्तीर्ण झाल्यावर अखिल भारतीय स्तारवरचे प्रमाणपत्र |
| २. | सुसज्ज प्रशासकीय इमारत व कार्यशाळा. | ९. | अनुभवी व तंत्र निदेशक वर्ग |
| ३. | रोजगार/नोकरीची खात्री देणारे प्रशिक्षण. | १०. | प्रात्यक्षिकावर आधारित प्रशिक्षण |
| ४. | पात्र प्रशिक्षणार्थ्यांना विद्यावेतन. दरमहा ५००/- रुपये ८०% उपस्थिती अनिवार्य | ११. | एस.टी पासची सोय |
| ५. | ग्रंथालय सुविधा, सुसज्ज AVTS Room, Computer Lab. | १२. | अद्यायावत वसतीगृह सुविधा |
| ६. | सर्व प्रशिक्षणार्थी शिकाऊ उमेदवारांना कंपनी मधुन अप्रेंटिशीपची संधी | १३. | निसर्ग रम्य वातावरण |
| ७. | तंत्रनिकेतनास ( Diploma) थेट दुसऱ्या वर्षात प्रवेश (अटी लागू) | १४. | ८०% उपस्थिती आवश्यक |

*** प्रवेशासाठी आवश्यक कागदपत्रे ***

| अ.क्र. | प्रवेश तपशिल | प्रवेशासाठी आवश्यक मुळ कागदपत्रे |
|---|---|---|
| १) | अनुसूचित जाती (SC) प्रवर्ग | दहावी गुणपत्रिका, शाळा/कॉलेज सोडल्याचा दाखला, उमेदवाराचे जातीचे प्रमाणपत्र |
| २) | अनुसूचित जमाती (ST) प्रवर्ग | दहावी गुणपत्रिका, शाळा/कॉलेज सोडल्याचा दाखला, उमेदवाराचे जातीचे प्रमाणपत्र |
| ३) | विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्ग (VJNT-1, NT-2, NT-3) | दहावी गुणपत्रिका, शाळा/कॉलेज सोडल्याचा दाखला, उमेदवाराचे जातीचे प्रमाणपत्र नॉनक्रिमीलेअर प्रमाणपत्र (३१ मार्च २०२६ पर्यंत वैध असलेले प्रमाणपत्र) |
| ४) | इतर मागास प्रवर्ग (OBC) विशेष मागास प्रवर्ग (SBC) | दहावी गुणपत्रिका, शाळा/कॉलेज सोडल्याचा दाखला, उमेदवाराचे जातीचे प्रमाणपत्र नॉनक्रिमीलेअर प्रमाणपत्र (३१ मार्च २०२६ पर्यंत वैध असलेले प्रमाणपत्र) |
| ५) | अपंग, तांत्रिक, माजी सैनिक, प्रकल्पग्रस्त, बोस्टर स्कूल | दहावी गुणपत्रिका, शाळा/कॉलेज सोडल्याचा दाखला, व संबंधीत EWS प्रमाणपत्र |
| ६) | अन्य (OPEN) संवर्ग | दहावी गुणपत्रिका, शाळा/कॉलेज सोडल्याचा दाखला |
| ७) | इतर प्रमाणपत्र | NCC, MCC, जिल्हास्तर/राज्यस्तर/राष्ट्रीय क्रिडा स्पर्धा प्रमाणपत्र/रहीवाशी दाखला/तीन फोटो/आधार कार्ड, राष्ट्रीयकृत बँक पास बुक झेरॉक्स, |

- * आपले प्रवेश अर्ज विहीत मुदतीत https://admission.dvet.gov.in या संकेतस्थळा वरुन ऑनलाईन सादर करावे.
- * प्रवेश माहिती पुस्तिका ही https://admission.dvet.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
- * प्रवेश प्रक्रिया ही प्रवेश नियमावलीतील भाग १ व भाग २ दोन नुसार होईल. प्रवेश प्रक्रिया शनिवार, रविवार व सुट्टीच्या दिवशी चालू राहील.
- *

*** महत्वाची सुचना ***

१) ऑनलाईन प्रवेश भरल्यानंतर उमेदवारांना मिळालेला युजर आयडी व पासवर्ड जतन व नोंद करुन ठेवावा. पुढील प्रवेश प्रक्रियेच्या सर्व टप्प्यावर अंतिम प्रमाणपत्र मिळेपर्यंत तो आवश्यक आहे.
२) ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर विहीत शुल्क भरावे.
३) अर्ज निश्चितीसाठी (Confirmation) जवळच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेस भेट द्यावी. अर्ज निश्चित झाल्या शिवाय विकल्प (Option) दिसणार नाही.
४) अर्ज निश्चितीची पावती व निश्चित केलेल्या अर्जाची प्रत प्राप्त करुन घ्यावी व प्रवेश फेरीच्या वेळी संस्थेत सादर करावी.
५) अर्ज निश्चिती करताना भरलेल्या अर्जाची एक प्रत व सर्व आवश्यक कागदपत्राची झेराक्स प्रत जोडावी. तसेच आवश्यक तेवढ्या प्रती काढून स्वतः जवळ ठेवाव्यात.
६) उमेदवाराने आपला अर्ज भरताना स्वःताचा किंवा आपल्या कुंटुबातील सदस्याचा चालू असलेला मोबाईल क्रमांक व आपला ई-मेल आयडी बिनचूक पणे नोंदवावा. प्रवेश प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत दिलेला मोबाईल क्रमांक व ई-मेल आयडी, बदलू नये. नोंदविलेला मोबाईल क्रमांक आपल्या आधार कार्डशी व बँक खात्याशी जोडलेला असणे आवश्यक आहे. त्या शिवाय SID पोर्टलवर आपला PRN जनरेट होणार नाही.
७) निश्चित झालेल्या अर्जाची (Confirmed Application) प्रत व शुल्क भरल्याची पावती जपून ठेवावी.
८) प्रशिक्षणार्थ्याने प्रशिक्षण अर्धवट सोडल्यास पुर्ण प्रशिक्षण शुल्क वसुल करण्यात येईल.
९) प्रवेशाच्या वेळी सर्व मुळ कागदपत्रे व तीन झेरॉक्स सेट सोबत आणावे.
१०) प्रवेश निश्चित झाले नंतर जमा केलेले प्रशिक्षण शुल्क व अनामत रक्कम परत मिळणार नाही.
११) ऑनलाइन स्वरुपात शुल्क स्वीकारले जाणार नाही.

*** प्रवेशित उमेदवारांना खालील प्रमाणे शुल्क रोखीने भरावे लागेल. ***

| अ.क्र. | व्यवसायाचे नाव | कालावधी | खुल्या गटा करीता वार्षिक शुल्क रुपये (Open) | (Open) Total Rs. | मागासवर्गीया करीता वार्षीक शुल्क रुपये |
|---|---|---|---|---|---|
| 1. | वीजतंत्री (इलेक्ट्रीशयन) | 02 वर्षे | 2 वर्षे प्रशिक्षण शुल्क 2000+600 अनामत + 50 ओळखपत्र +200 ग्रंथालय +200 सांस्कृतिक कार्य +200 इंटरनेट | 02 वर्षे 3250/- | 02 वर्षे 1250/- |
| 2. | जोडारी (फिटर) | 02 वर्षे | 2 वर्षे प्रशिक्षण शुल्क 2400+600 अनामत + 50 ओळखपत्र +200 ग्रंथालय +200 सांस्कृतिक कार्य +200 इंटरनेट | 02 वर्षे 3650/- | 02 वर्षे 1250/- |
| 3. | वेल्डर (संधाता) | 01 वर्षे | 1 वर्षे प्रशिक्षण शुल्क 1200+600 अनामत +50 ओळखपत्र +100 ग्रंथालय +100 सांस्कृतिक कार्य +100 इंटरनेट | 01 वर्षे 2150/- | 01 वर्षे 950/- |
| 4. | पंप ऑपरेटर कम मेकॅनिक | 01 वर्षे | 1 वर्षे प्रशिक्षण शुल्क 1000+600 अनामत +50 ओळखपत्र +100 ग्रंथालय +100 सांस्कृतिक कार्य +100 इंटरनेट | 01 वर्षे 1950/- | 01 वर्षे 950/- |
| 5. | ड्रेसमेकींग | 01 वर्षे | 1 वर्षे प्रशिक्षण शुल्क 800+600 अनामत +50 ओळखपत्र +100 ग्रंथालय +100 सांस्कृतिक कार्य +100 इंटरनेट | 01 वर्षे 1750/- | 01 वर्षे 950/- |
| 6. | वसतिगृह | | अनामत 1000/वार्षिक शुल्क 1200 | 2200/- | 2200/- |

टीप :
प्रवेशाच्या सविस्तर माहिती साठी संस्थेत प्रत्येक्ष संपर्क साधावा.

प्राचार्य
औद्योगिक प्रशिक्षण संस्था, अक्कलकोट
जिल्हा सोलापूर.